# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 03/01/2024 (बुधवार) सायंकाळ

---

## चोरी

**पोस्टे रामटेक :–** अंतर्गत ०५ किमी अंतरावर मौजा नवरगाव शेत शिवार येथे दिनांक २९/१२/२०२३ चे १८.०० वा. ते दिनांक ३०/१२/२०२३ चे १४.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– रमेश नामदेवराव हटवार, वय ५८ वर्ष, रा. विवेकानंद वार्ड रामटेक यांची चार एकर शेती नवरगाव येथे असुन शेतीमध्ये विस बाय विसचे पक्क्या विटाचे घर बांधलेले आहे. त्याला लोखंडी पत्र्याचे दार लावलेले आहे घराचे वर टिनाचे शेड आहे. शेतामध्ये विहीरीजवळ शेतीला लागणारे साधने, सब्बल, पाण्याचे इंजन, झिंक पावडर, सोडा सल्फेट व इतर साहीत्य असे दिनांक २९/१२/२०२३ रोजी सांयकाळी ०६/०० वा. दरम्यान शेतामध्ये विहिरीजवळ ठेवुन नेहमीप्रमाणे शेतातील घराला कुलुप कोंडा लावुन रामटेकचे घरी आले. दिनांक ३०/१२/२०२३ रोजी दुपारी ०२/०० वा. दरम्यान फिर्यादीचे शेतावर काम करणारा नवरगाव येथील नामे शेषराव खडसे याचा फोन आला व त्याने फिर्यादीला फोनवर सांगीतले की, तुमच्या शेतातील सामान चोरीला गेले आहे. असे फिर्यादीला सांगितल्याने फिर्यादीने आपले शेतात जावुन पाहीले असता शेतातील घराचे बाजुला विहीरीजवळ ठेवलेले पाण्याचे इंजिनवर ठेवलेले टिनाचे झाकण इंजिनचे चार चाके, दोन लोखंडी पाईप, दोन झिंक पावडर सल्फेट असे दिसुन आले नाही शेताचे परीसरात आजुबाजुला शोध घेतला असता मिळुन आले नाही. दिनांक २९/१२/२०२३ चे सायं. ०६/०० वा. ते दिनांक ३०/१२/२०२३ चे दुपारी ०२/०० वा. दरम्यान शेतातील विहीरीजवळ ठेवलेले साहीत्य पाण्याचे इंजिनवर ठेवलेले टिनाचे झाकण, इंजिनचे चार चाके, दोन लोखंडी पाईप दोन झिंक पावडर सल्फेट असे साहीत्य एकुण किंमती ६०००/– रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी पोलीस हवालदार अमोल इंगाले यांनी भेट दिली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार अमोल इंगोले, मो. क्र. ८८३०६२१२३३ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर